# वर्धा जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणात उमेदचे योगदान

**कु. शुभांगी भगवानजी राऊत**
संशोधक विद्यार्थी
रा.तु.म.नागपुर विद्यापीठ, नागपुर
Email - shubhangitanay1234@gmail.com
मो.नं.: 9511602868

**डॉ. विठ्ठल मा. घिनमिने**
संशोधक मार्गदर्शक
सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला आणि विज्ञान महाविद्यालय, वडणेर जि. वर्धा
Email - vghinmine1980@gmail.com
मो.नं.: 9689642449

---

**गोषवारा :**

*ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलनासाठी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोंन्नती अभियान हा एकमेव समग्र असा कार्यक्रम महाराष्ट्र राज्यात राबविण्यात आलेला आहे. या अभियाना मार्फत तयार झालेल्या समुदायास्तरीय संस्था या विविध विकास योजनांच्या वाहक म्हणून कार्य करीत आहेत. ग्रामीण भागातील पाणीपुरवठा, स्वच्छता, पोषण आहार, आरोग्य, महात्मा गांधी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना, सामाजिक सुरक्षा योजना इत्यादी महत्त्वपूर्ण योजनांचा लाभ घेण्याकरिता सदर समुदास्तरीय संस्था सातत्याने प्रयत्न करत आहेत. त्यामुळे राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी सदर अभियान अत्यंत उपयुक्त आहे. या अभियानांतर्गत सामाजिक समावेशन, संस्थीय बांधणी, आर्थिक समावेशन, ग्रामीण क्षेत्रातील महिलांचे हक्क व अधिकार त्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. गरीब महिलांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी त्यांना रोजगार मिळावा व त्यांचे जीवनमान सुधारावे यासाठी त्यांना स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून प्रोत्साहन देण्यात येत आहे. गरीब, गरजू व बेरोजगार महिलांना या माध्यमातून प्रेरणा देण्याचा प्रयत्न आहे. महिलांना त्यांच्या हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच त्यांना आत्मबळ मिळून महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान (Maharashtra State Rural Livelihoods Mission - MSRLM) हा भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अंतर्गत चालवला जाणारा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. हा अभियान ग्रामीण भागातील गरीब लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी आणि त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांना स्वरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करणे हा आहे.*

**बीज शब्द (Key Words) :** आर्थिक स्थैर्य, नाविन्यपुर्ण, स्वयंसहाय्यता गट, वित्तीय समावेशन

---

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) हा महाराष्ट्र सरकारचा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे जो ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा

करण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील लोकांना स्वावलंबी बनवणे, त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे हा आहे. या अभियानांतर्गत स्वयंसहायता गट तयार करण्यात येतात. त्या माध्यमातून महिलांनी नाविन्यपूर्ण कामे केलेली आहेत. त्यामुळे ग्रामविकास क्षेत्रात एक वेगळी दिशा मिळाली आहे. अशा नाविन्यपूर्ण पद्धतीने काम करणारे स्वयंसहायता गट व महिलांना विकासाचे दिपस्तंभ म्हणता येईल. राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्याचे निर्मूलन करण्यासाठी महिलांचे संघटन निर्माण करून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गरिबांना दारिद्र्यातून बाहेर येण्याची तीव्र इच्छा आहे आणि ते त्यासाठी संवेदनशील देखील आहेत.त्यांना व्यावसायिक आदर मिळावा. यासाठी उमेद सातत्याने प्रयत्नशील असून ग्रामीण जीवनाला उभारी देण्याचा त्यामागे प्रयत्न आहे. या अभियानाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्यात येत असून त्यांना स्वयंपूर्ण करण्याचे यशस्वी प्रयत्न करण्यात येत आहे. गटाचे जलद आणि प्रभावी निर्मिती करण्यात येत आहे. हे काम करीत असताना गावस्तरावर विविध कामे हाती घेण्यात आली असून यशस्वीरित्या कार्य पूर्ण करणाऱ्या महिलांसाठी उमेद यशस्विनी ठरत आहे.

**उमेद अभियानाची मुख्य उद्दिष्टे :**

1) **ग्रामीण उद्योजकता वाढवणे :** ग्रामीण भागातील महिलांना स्वरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
2) **आर्थिक सक्षमता :** ग्रामीण महिलांच्या उत्पन्नात वाढ करणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे.
3) **कौशल्य विकास :** ग्रामीण भागातील महिलांना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
4) **सामाजिक व आर्थिक सुधारणा :** ग्रामीण भागातील महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीत सुधारणा करणे.
5) **कृषी आधारित उद्योग :** कृषी आधारित उद्योगांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या उत्पादनाचा बाजारपेठेत प्रवेश सुलभ करणे.

**उमेद अभियानाचे फायदे :**

- ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी बनवणे.
- ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे.
- बेरोजगारीत घट करणे.
- ग्रामीण भागातील महिलांच्या जीवनस्तरात सुधारणा करणे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद या स्वतंत्र नोंदणी कृत संस्थेची स्थापना राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (आजीविका) या विकास कार्यक्रमाच्या महाराष्ट्र राज्यातील प्रभावी अंमलबजावणी करता केली आहे. उमेद अभियानाचे संचालन ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून केले जाते. राज्यातील 45 लक्ष गरीब कुटुंबापर्यंत पोहोचून त्यांना गरिबीतून मुक्त करण्यासाठी सुनियोजित आणि वेगवेगळ्या टप्प्यांवर सहाय्य करणे, उमेद अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य

निर्मूलनासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात केली आहे. गरीब जनता दारिद्र्याच्या विळखातून बाहेर पडू शकते, पण त्यांना बाहेर काढण्याकरता आवश्यक ते सहाय्य केले पाहिजे, या विश्वासातून गरिबांनी संस्था निर्माण करून त्या माध्यमातून ग्रामीण भागातील गरिबांच्या कौटुंबिक उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कुशल आणि प्रभावी व्यासपीठ देण्यात आले आहे . यात उत्पन्न वाढीसाठी पायाभूत आणि शाश्वत उपजीविकेच्या पर्यायांचा अंतर्भाव आहे.तसेच वित्तिय आणि सार्वजनिक सेवेचा ग्रामीण भागातील गरीब व दुर्लक्षित लोकांपर्यंत विस्तार करण्यात हा उपक्रम भर देतो. ग्रामीण भागातील गरीब आणि दुर्लक्षित ग्रामस्थांना रोजगार निर्मितीसाठी स्वयं संचालित सांघिक संस्थांमार्फत एकत्र आणायचे महत्त्वाचे काम वेठबिगार, निराधार, परित्यात, विधवा, एकलव्यक्ती, तृतीयपंथी, जोगीन देवदासी, वेश्या महिला इत्यादी वंचित घटकांचे संघटन क्षमता बांधणे व अर्थसाहेय यांच्याच माध्यमातून जीवन उन्नतीची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**वर्धा जिल्ह्यातील महिला सक्षमीकरण करण्यास उमेद चे योगदान :**

**अर्थसहाय्य :**

1) स्वयंसहायता गटाला अभियानाकडून फिरता निधी रुपये १० हजार ते १५ हजार देण्यात येतो.
2) ग्राम संघाला समुदाय गुंतवणूक निधी रुपये ३ ते ५ लाख देण्यात येतो.
3) बँकेकडून स्वयंसहायता गटाला अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते.
4) अभियानांतर्गत वर्धा जिल्ह्यातील इंटेन्सिव्ह तालुका मध्ये एकूण 520 ग्रामपंचायत व 130073 गावांमध्ये काम चालू असून उमेद कर्मचारी कार्यरत आहे यामध्ये गाव स्तरावर स्वयं सहायता गटा पर्यंत पोहचून अभियानाची माहिती देण्याचे काम केले जात आहे. याकरता गाव स्तरावर विविध गटामधून समुदाय संसाधन व्यक्ती कार्यरत आहे.

वर्धा जिल्हा हा सुरुवातीपासून होम ग्रोन मॉडेल म्हणून कार्यरत आहे. 2009 पासून वर्धा जिल्ह्यात स्वयंसहायता गटाचे काम चालू आहे. उमेद अर्थात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोंनती अभियान अंतर्गत 2013 पासून वर्धा जिल्हात सक्षमपणे कार्यरत आहे.

**कार्यप्रणाली :**

1) **प्रशिक्षण कार्यक्रम:** उमेद अभियान अंतर्गत ग्रामीण भागातील युवक आणि महिलांना विविध कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातात. यात माहिती तंत्रज्ञान, हस्तकला, कुटीर उद्योग, शेती संबंधित तंत्रज्ञान इत्यादी विषयांचा समावेश असतो.
2) **स्वयंसहाय्य गटांना पाठिंबा:** महिला स्वयंसहाय्य गटांना आर्थिक सहाय्य आणि मार्गदर्शन प्रदान करून त्यांना स्वावलंबी बनवणे.
3) **उद्योजकता विकास :** ग्रामीण भागातील लोकांना उद्योजकता प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना आणि सबसिडी उपलब्ध करून दिल्या जातात. यामध्ये लहान आणि मध्यम उद्योग सुरू करण्यासाठी आर्थिक मदत आणि तांत्रिक मार्गदर्शन समाविष्ट आहे.
4) **रोजगार मेळावे आयोजन :** ग्रामीण भागातील लोकांना रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार मेळावे आयोजित केले जातात. यामध्ये विविध कंपन्या आणि संस्था सहभागी होऊन लोकांना

नोकरीच्या संधी उपलब्ध करून देतात.

5) **आर्थिक सहाय्य आणि कर्ज सुविधा :** उमेद अभियान अंतर्गत ग्रामीण भागातील लोकांना स्वरोजगार सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य आणि कर्ज सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

6) जिल्हास्तरीय प्रदर्शनी व विक्री महिलांनी उत्पादन केलेल्या वस्तूचे विक्री करण्यासाठी वर्धिनी महोत्सावाचे आयोजन करुन महिलांचा आर्थिक लाभ कसा प्राप्त होईल. या साठी विक्रीसाठी प्रदर्शनीचे आयोजन केले जाते.

**योजनांची अंमलबजावणी :**

- **जिल्हा आणि तालुका स्तरावर कार्यक्रम:** उमेद अभियानाची अंमलबजावणी जिल्हा आणि तालुका स्तरावर केली जाते. प्रत्येक जिल्ह्यात योजनांच्या अंमलबजावणीसाठी विशेष अधिकारी नियुक्त केले जातात.
- **सहभागी संस्था:** या अभियानात विविध सरकारी आणि खाजगी संस्था सहभागी होतात. यामध्ये बँका, कौशल्य विकास संस्था, आणि उद्योग संघटना यांचा समावेश होतो.

**उमेदचे महिलांच्या आर्थिक विकासात योगदान :**

1) **हळदी उद्योग प्रक्रिया** :

जिल्हा नियोजन समिती वर्धा कडून नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून हळदी उद्योग प्रक्रिया वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर तालुक्यातील वायगाव (हळदा) हे गाव तेथील उच्च प्रतीच्या हळद पिकांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे.हळद पिकावर प्रक्रिया करून हळद पावडर तयार करणाऱ्या सयंत्र प्रकल्पाच्या निर्मिती करिता जिल्हा नियोजन समितीमार्फत सन 2014 मध्ये निधी उपलब्ध करून दिला आहे. सदर सयंत्र हे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद वर्धा सहाय्यित वायगाव (हळदा) गावातील स्वयंसहायता महिला बचत समुहा अंतर्गत समस्त नोंदणीकृत महिलाद्वारे संचालित केले जात आहे. सन 2018-19 मध्ये 52 किलो हळद 8.30 लाखात खरेदी करण्यात आले व 5.30 लक्ष हळद विक्री करण्यात आली. याप्रमाणे हळद प्रक्रिया उद्योग चालू आहे. ग्रामीण भागातील महिलांसाठी रोजगार निर्माण झाला. जुन्या पद्धतीनुसार हळद प्रक्रियेच्या वेळेत बचत आणि अतिरिक्त कामाचा व्याप तसेच अतिरिक्त लागणाऱ्या विजेची बचत होईल. हरिद्रा संजीवनी वायगाव हळद या नावाने ब्रँड तयार केला असून या प्रकल्पाचे सोसायटीच्या कायद्यानुसार रजिस्ट्रेशन झालेले आहे. या माध्यमातून महिलांनी सेंद्रिय पद्धतीने निर्मित केलेल्या हळदीचे विविध ठिकाणी विक्री करीत आहे .दिल्ली, मुंबई ,पुणे इतर ठिकाणी आयोजित होणाऱ्या प्रदर्शनी मध्ये वायगाव हळदीच्या विक्रीचे प्रमाण अधिक आहे. या हळदीमध्ये आढळून येत असलेल्या करक्यूमाईन घटकामुळे तयार झालेल्या हळद पावडरला बाजारपेठेत चांगलीच मागणी असून त्या माध्यमातून महिलांना उत्तम नफा मिळत आहे.

2) शेती हाच पर्याय नसून उद्योगशील बनण्याची वाटचाल करण्यासाठी तेजस्विनी टेक्नॉलॉजी सहकारी संस्था रोठा, जिल्हा वर्धा. वर्धा जिल्हा हा होम ग्रोंन मॉडेल म्हणून कार्यरत आहे. वर्धा जिल्ह्यामध्ये उमेद अंतर्गत

विविध उपजीविकेचे साधन महिला कता उपलब्ध करून देण्यात आले आहे. याच अनुषंगाने ट्रेडल पंप (पाणी ओढण्याचा पंप) हा व्यवसाय चालू करण्याबाबत संपूर्ण माहिती चे प्रशिक्षण महिलांना देण्यात आले. नाविन्यपूर्ण योजना अंतर्गत 11 लाख रुपये या व्यवसायाला मिळ ले. हा पंप लहान असून लहान शेतकऱ्यांकरिता आहे. ज्यांच्याकडे वीज नाही असे शेतकरी याचा वापर करू शकतात. या उद्योगाला चालवण्याकरता सात महिलांनी ट्रेडल पंपचे यवतमाळला प्रशिक्षण घेतले. यामध्ये एक पंप बनविण्या करिता 4350 /- रुपये खर्च येतो आणि तो 5550/- रुपयाला त्याची विक्री केली जाते. यामध्ये एकूण नफा 1200/- रुपयाचा प्राप्त होतो. यात महिलांची मजुरी देण्यात येते. अशा पद्धतीने यशस्वीपणे व्यवसाय चालू आहे. मशीन तयार करण्याकरिता संपूर्ण ट्रेडल पंप मशीन तयार करण्याकरता 4350/- रुपये लागतो त्यामध्ये बाराशे रुपये चा फायदा होतो आणि एक मशीन 5500/- रुपयाला किमतीला विकली जाते.

**3)** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तालुकास्तरीय अभियान व्यवस्थापन कक्ष सुकळी (स्टेशन) येथे पाच वर्षापासून उमेद अभियानाचे कार्य आहे .सदर गावात एकूण 11 स्वयंसहायता गट आहे.सगळ्या गटाने एकत्र येऊन संघर्ष ग्राम संघाची स्थापना केली. यांच्या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये स्वयंसहायता गट सक्षम होण्याकरता प्रशिक्षण देणे, बळकटीकरण करणे , समुदाय गुंतवणूक ,निधी कर्ज, अंतर्गत देवाण-घेवान या माध्यमातून पैसा उपलब्ध करून देण्यात येतो. गरीब कुटुंबांना शाश्वत उपजवीकेबाबत मार्गदर्शन, सहकार्य करने,जेणेकरून त्यांचे उपजीविका शाश्वत झाली पाहिजे आणि उत्पन्न देखील झाले पाहिजे. या कार्यक्रमातून गटातील महिलांनी त्यांच्या कौशल्याचे प्रशिक्षण देण्याचे कार्य केल्याने त्यांनी गटातून कर्ज घेऊन तीन महिन्यांचे शिवण कामाचे प्रशिक्षण घेतले. गटातून दहा हजार रुपये घेऊन शिलाई कामाचा व्यवसाय सुरू केला. फक्त जनरल व सौंदर्य प्रसाधने या वस्तूदेखील दुकानात ठेवण्यास सुरुवात केली. तसेच दहा हजार रुपयाचे परतफेड झाल्यानंतर पुन्हा कर्ज घेऊन आलेल्या नफ्यातून गटातील कर्जाची परतफेड केली आणि पन्नास हजार रुपये मुद्रा कर्जाचा प्रस्ताव बँक सभेच्या माध्यमातून मंजूर करून घेतला.ग्राम संघाचे समुदाय गुंतवणूक निधीतून पन्नास हजार ते एक लाख रुपयांच्या कर्ज घेतले आणि शिवणकामा सोबत स्टेशनरी, जनरल व सौंदर्य प्रसाधने, झेरॉक्स मशीन प्रिंटर्स व्यवसाय सुरू केला. त्यामुळे महिलांना स्वतःची ओळख मिळते आहे आणि त्या सक्षम होण्यास फायदा झाला आहे.

**4)** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत तालुकास्तरीय अभियान व्यवस्थापन कक्ष सुकळी (स्टेशन) येथे पाच वर्षापासून उमेद अभियानाचे कार्य आहे. सदर गावात एकूण 11 स्वयंसहायता गट आहे. सगळ्या गटाने एकत्र येऊन संघर्ष ग्राम संघाची स्थापना केली. यांच्या अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये स्वयंसहायता गट सक्षम होण्याकरता प्रशिक्षण देणे, बळकटीकरण करणे, समुदाय गुंतवणूक, निधी कर्ज, अंतर्गत देवाण-घेवाण या माध्यमातून पैसा उपलब्ध करून देण्यात येतो. गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीवीकेबाबत मार्गदर्शन, सहकार्य करणे, जेणेकरून त्यांचे उपजीविका शाश्वत झाली पाहिजे आणि उत्पन्न देखील झाले पाहिजे. या कार्यक्रमातून गटातील महिलांनी त्यांच्या कौशल्याचे प्रशिक्षण देण्याचे कार्य केल्याने त्यांनी गटातून कर्ज घेऊन तीन महिन्यांचे शिवण कामाचे प्रशिक्षण घेतले. गटातून दहा हजार रुपये घेऊन शिलाई कामाचा व्यवसाय सुरू केला. फक्त जनरल व सौंदर्य प्रसाधने या वस्तूदेखील दुकानात

ठेवण्यास सुरुवात केली. तसेच दहा हजार रुपयाचे परतफेड झाल्यानंतर पुन्हा कर्ज घेऊन आलेल्या नफ्यातून गटातील कर्जाची परतफेड केली आणि पन्नास हजार रुपये मुद्रा कर्जाचा प्रस्ताव बँक सभेच्या माध्यमातून मंजूर करून घेतला.ग्राम संघाचे समुदाय गुंतवणूक निधीतून पन्नास हजार ते एक लाख रुपयांच्या कर्ज घेतले आणि शिवणकामा सोबत स्टेशनरी, जनरल व सौंदर्य प्रसाधने, झेरॉक्स मशीन प्रिंटर्स व्यवसाय सुरू केला. त्यामुळे महिलांना स्वतःची ओळख मिळते आहे आणि त्या सक्षम होण्यास फायदा झाला आहे.

5) शेळीपालन उमेद अंतर्गत समाज कल्याण नाविन्यपूर्ण योजना निधी मार्फत 18 लाख 54 हजार रुपये प्राप्त झाले. या निधीचा उपयोग त्याने स्वयंसहायता समूहातील महिलांच्या उपजीविकेसाठी केला यासाठी त्यांनी शेळी पालन व्यवसाय निवडला सुरुवातीला त्यांनी संघाचे जागा 50 हजार रुपये मध्ये विकत घेतले आणि व्यवसायाच्या सुरुवातीस एकूण दहा शेळया आणि एक बोकड खरेदी करण्यात आले.त्यांची एकूण किंमत 50 हजार रुपये होती. आता या व्यवसायात संघातील फक्त महिलावर्ग सहभागी असून त्या प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहेत. सध्या एकूण शेळया 34 व बोकड 4 आहे. यांची किंमत रुपये दोन लाख 50 हजार रुपये आहे.

6) न्यू आदर्श ग्रामसेवक संघ भिडी"शिक्षण व ज्ञान कमी तरी व्यवसायाचे कास धरी" या मनीप्रमाणे कुक्कुटपालन हा व्यवसाय सुद्धा गटांतील हाती घेतला. शेळीपालन व्यवसायात यश मिळत होते ग्राम संघातील महिलांनी कुक्कुटपालन करण्याचे निर्णय घेतला त्यासाठी त्यांनी सुरुवातीला १०० कोंबड्या 75 हजार रुपयांस खरेदी केल्या तसेच आजपर्यंत सहा हजार रुपये खर्च कोंबडी खाद्यासाठी झाला हा खर्च एकूण दहा कोंबड्या विकून त्यातून आलेल्या पैशातून केला आचार्य शेतीला कोंबडी मादी ची संख्या ५० आणि नर कोंबड्याची संख्या पाच पिल्याच्या एकूण किंमत 4 लाख 50 हजार रुपये आहे.

**निष्कर्ष :**

उमेद अभियानामुळे ग्रामीण स्तरांवरील महिलांच्या उत्पन्नामध्ये आर्थिक बदल झालेला आहे. हा बदल आर्थिक सामाजिक, तसेच वैचारिक स्वरुपाचा आहे. या अभियानामुळे महिलांमध्ये निर्माण झालेली नवी उमेद ग्रामीण भागाचा आर्थिक विकासाचा मार्ग सुकर करणारी आहे. महिलांना स्वावलंबी करण्याचे प्रामाणिक प्रयत्न आणि त्यातुन निर्माण झालेली आशा नक्कीच विश्वसनीय ठरणारी आहे. ग्रामीण भागातील गरीबांच्या आयुष्यातील दारिद्र दूर व्हावे आणि त्यांच्या आयुष्यात सुख-समृध्दी व आनंदाचे दिवस यावे, त्यांचे राहणीमान सुधारावे, प्रत्येक महिला सक्षम, समृद्ध व्हावी, यासाठी उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीनोन्नती अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहेत. महाराष्ट्र राज्यातील वर्धा जिल्ह्यामध्ये अभियान राबविण्यात येत आहे. गरीब स्त्रियांना संघटित करण्यासाठी स्वयंसहाय्यीत गटाची रचना करण्यासाठी या अभियानामार्फत मदत केली जात आहे.कठीण परिस्थीतीत, कठीण परिसरांमध्ये शाश्वत उपजीविका निर्माण करण्याच्या सर्व बाबींचा समावेश आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

- विजय खेबुडकर : महिला सशक्तीकरण:संकल्पना आणि आव्हाने, प्रज्ञा प्रकाशन, धंतोली नागपुर
- कुलकर्णी मंजूषा : स्त्री उद्योगाची गोष्ट, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

- योजना विकासाच्या, जिल्हा माहिती कार्यालय, वर्धा.
- जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा जिल्हा.
- उमेदच्या यशस्विनी, जिल्हा प्रशासन,महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन.